
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 2 | OCTOBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# अनसिंग : एक ऐतिहासिक मागोवा

प्रा. डॉ. सचितानंद एस. बिचेवार
सहाय्यक प्राध्यापक , श्री प.दि.जैन महाविद्यालय, अनसिंग ता.जि. वाशिम.



## प्रस्तावना :

इतिहास अस्मितेसोबतच समाजाच्या भावी वाटचालीसाठी , प्रेरणा व स्फूर्तीसाठी अत्यंत महत्वाचा घटक आहे. भारतीयांच्या संदर्भात असे म्हटल्या जाते की, भारतीय इतिहास घडवितात, पण त्याची व्यवस्थित नोंद ठेवीत नाहीत. म्हणून आपला अत्यंत अभिमानास्पद इतिहास अजुनही काळाच्या उदरात दडपला गेला आहे. उपलब्ध इतिहासावरून आपण आपला स्वाभिमान जागृत ठेवून वाटचाल करीत आहोत. परंतू सुप्त, काळाच्या उदरात असलेला इतिहास शोधून समाजापुढे आणने आमचे कर्त्यव्य आहे. युरोप, अमेरिकेमध्ये प्रत्येक गावाचा इतिहास व संस्कृतीचे जतन करून ठेवणारे वास्तुसंग्रहालय असते. अशा संग्राहलयाचा गावकऱ्यांना मोठा आभिमान असतो. आमच्याही परिसराचा इतिहास निश्चितच आमच्यासाठी दखलपात्र असून आम्हासाठी तो आभिमानाचा विषय असला पाहीजे. म्हणून आता स्थानिक इतिहास लेखनास महत्व प्राप्त होत आहे. त्यानुसार अनसिंग जि. वाशिम येथील ऐतिहासिक संदर्भाचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे. भारतातील अनेक शहरे व गावांचा इतिहास अभ्यासल तर त्या त्या गावाच्या नावामध्ये काहीतरी विशेष संदर्भ असल्याचे दिसून येतात. त्यातही प्राचीन काळापासूनच माणूस धर्मप्रिय असल्याने त्या त्या धर्माच्या देवतांचा, तीर्थस्थळाचा, एखादया विशेष घटनेचा, ऋषिमुनीचा, त्यांच्या वास्तव्याचां, तपश्चर्याचा संदर्भ ग्रामनामा सोबत जोडलेला दिसून येतो. विशेषतः प्राचीन वत्सगुल्म व आजचे वाशिमतच्या नावाच्या संदर्भ तपस्वी वत्सऋषी यांच्या सोबत तर कारंजा शहराचा इतिहास करंज ऋषिच्यां नावा सोबत जोडल्या जातो.

## अनसिंग नगरीचे नाव :-

याच प्रमाणे वाशिम पासून २४ कि.मी. अंतरावर असलेल्या आजच्या अनसिंग गावाचा इतिहासही शृंगऋषींच्या नावासोबत जोडला जातो. पौराणिक कथानकानुसार प्राचीन दंडकारण्यामध्ये तपश्चर्या करण्यासाठी येणाऱ्या अनेक ऋषीमूनीप्रमाणेच विभांडक ऋषीचे पूत्र शृंगऋषी या ठिकाणी तपश्चर्या करीत होते.[१] या शृंगरूषीच्या डोक्यावर शिंग स्वरूपांचे एक चिन्ह होते. त्यांच्या या विशेषणा वरूनच पूढे एकशिंगी ऋषीचे अनसिंग असे नामकरण झाले असावे. मराठी व्याकरणाच्या नियमानुसार अनु म्हणजे समोर किंवा एक. याचा शृंगऋषी सोबत संबंध जोडला तर समोर (डोक्यावर/कपाळावर) शिंग असणारा किंवा एकशिंगी ऋषी असा होतो. यावरून अपभ्रंश होत होत अनुशिंगचा अनसिंग असा उल्लेख झाला असावा.[२] जुने जाणकार व दंतकथाही या गोष्टीला पूष्ठी देत असल्याने अनसिंग नगरीचे नामकरण शृंगऋषींच्याच संदर्भात झाल्याचे स्पष्ट होते.

## प्राचीन समृध्द वारसा :-

अनसिंगच्या प्राचीनत्वाचा ठोस पूरावा उपलब्ध नसला तरी पूराणे, अख्यायीका, दंतकथा या सारखे साहित्यीक, मौख्यीक व काही भौतिक साधने लक्षात घेता शृंगरूषीच्या संदर्भ थेट रामायण काळापर्यंत जात असल्याने या नगरीला निश्चीतच प्राचीनत्व लाभले असावे. खोदकामात प्राप्त होत असलेल्या वेगवेगळया शैव, जैन आदि मूर्त्या, अवशेष[३] नगरीचे प्राचीनत्व सिध्द करू शकतात. अनसिंग परिसराचा प्राचीन समृध्द इतिहास वाकाटक काळामध्ये निश्चीतच समृध्द असावा असे वाटते. कारण वत्सगुल्म हे वाकाटक घराण्याची

राजधानी असून त्यावेळी विद्या, कला व साहित्याच्या दृष्टीने या नगरीने आपले वेगळे अस्तित्व सिध्द केलेले असल्यामुळे वाशिम पासून २४ कि.मी. अंतरावरील अनसिंग या समृध्द वारस्यापासून पासून निश्चीतच वेगळे नसावे. आपणास इतिहास घडविता येतो, पण तो इतिहास लिहण्याची सवय नाही. त्यामुळे समृध्द मोठा वारसाही आपण पूराव्यानिशी कधी कधी सिध्द करू शकत नाही. तरी पण ऐकिंव, मौखीक, दंतकथात्मक व काही अप्रत्यक्ष पूरावे हे श्रेष्ठत्व सिध्द करण्यास मदत करतात. अशा साधनावरून अनसिंगलासुध्दा प्राचिन वारसा निश्चीतच लाभलेला दिसून येतो.

## उदय काळ :-

प्रामुख्याने प्रत्येक प्राचीन संस्कृतीच्या उदयाचा इतिहास पाहिला तर, मानवाने आपले वसतीस्थान पाण्याच्या जवळ म्हणजेच नदी, तलाव अथवा पक्या पाण्याच्या परिसरात केले दिसते. त्या नियमानुसार शृंगऋषींच्या तपश्चर्या ठिकाणाचा संदर्भ लावला तर आजही या ठिकाणचा कूंड प्राचीन व पक्या पाण्याचा मानला जातो. या नुसारच ऋषी तपश्चर्येचे ठिकाण व पाण्याची व्यवस्था यानुसार येथे वसती निर्माण झाली असावी. गावाचा इतिहास त्या त्या भौतिक अवशेषावरून अभ्यासतो म्हटलो तर अनसिंगची पांढरी आणि शृंगऋषीचे तपश्चर्यचे ठिकाण म्हणजे आजचे शृंगऋषी मंदिर हे एकाच टप्यात असलेले दिसतात. त्यावरून अनसिंग गावाची मूळ उभारणी आज असलेल्या गावाच्या पूर्वेला शृंगऋषी मंदिराकडील मार्गावर असलेल्या पाढरी शेतीच्या ठिकाणी झालेली होती हे स्पष्ट आहे. राजे यांच्या घराच्या पूर्वेकडील बाजूस एक गढी उभी असल्याचे जेष्ठ लोक सांगतात.[४] या जुन्या वसतीकडील परिसरातील जैन मुर्त्यांचे , शैव मृर्त्याचे प्राचीन अवशेष प्राप्त झाले आहेत. या परिसरापासुन विविध कारणामूळे गाव आज किती समोर आले त्यावरून अनसिंग गावाच्या प्राचिनत्वाचा अंदाज बांधता येतो. त्या नुसार या गावाला किमान हजार वर्षाची परंपरा लाभलेली दिसुन येते. काही काळ राजे उदाराम यांच्या अधिपत्याखालील गाव म्हणून यास उदापूर असेही संबोधन होते.[५] वारा जहागीर अंतर्गत (राजे उदारांमची जहागीर )येत असल्याने यास अनसिंग-वारा या नावाने संबोधण्यात येते.

## विकासाची वाटचाल :

हजारो वर्षाची परंपरा लाभलेल्या या गावाचा इतिहास मात्र विविध कारणामूळे दुर्लक्षीत राहिल्याने या परिसराचा नामोल्लेख इतिहासामध्ये,गॅझेटिअर, विश्वकोषामध्ये प्रभावाने येत नाही. तरीपण जुने जानकार परिसरातील सर्वात जुनी बाजारपेठ व शृंगऋषीचे तपश्चर्या ठिकाण म्हणून या गावाला प्राचीन ओळख असल्याचे सांगतात. याच ठिकाणी प्रागझी लिलाधर कंपनी ,मुंबईची शाखा असून कापूस खरेदी -विक्राचे हे मोठे केंद्र होते. जवळपास सहा रेचे , अनेक तेल घाणे या ठिकाणी होते.[६] पूढे ही कंपनी केशरीमल जैन यांनी विकत घेतली.याच केशरीमल धनराज जैन यांनी आज पदमप्रभ दिगंबर जैन विद्यालय असलेली ३९ गुंठे जागा शाळेला दान दिली.[७] अनसिंग गाव एकवेळ दूध व तूपाचे गाव म्हणुन प्रसिध्द होते.आज ३० ते ४० गावासाठी समृध्द बाजारपेठ व शिक्षण केंद्र म्हणून अनसिंग सुपरिचीत आहे.

## परिसरातील लोकांची स्वभाव विशेषत:

- साधारणत:हिंदू ,मुस्लिम ,जैन , बौध्द अशी बहुविध धर्म व अठरापगड जातीची वसती असलेल्या या गावात विविध धर्माअंतर्गत वेगवेगळया जाती -समूह अत्यंत गुण्यागोविंदाने वाटचाल करतात. प्रत्येक जात अथवा धर्माचा विवाह सोहळा ,धार्मिक उत्सव असो ,सुख आणि दु:खामधेही या ठिकाणचा समुदाय विविधतेत एकता शोधून वावरतांना दिसतो.
- अनेक चारित्र्यसंपन्न, अभ्यासू, विनयशिल, शिस्तप्रिय, दायीत्वाच्या भूमिकेतून कार्य करणाऱ्या प्रभावी मुख्याध्यापक, शिक्षकांच्या संस्कारामूळे या परिसरतील विद्यार्थी अंत्यत विनयशिल, शिस्तप्रिय आहेत.
  जे बाहेर अभावने दिसते.दु:खा मध्येही या ठिकाणचा समुदाय विविधतेमध्ये एकता शोधून वावरतांना दिसतो.
- साधारणत: शेती, उद्योग फारशे विकसीत नसेले तरी हा परिसर समाधानी जीवन जगतांना जाणवतो.
- विशेष म्हणजे अनसिंग व परिसरातील गावामध्ये अजूनही भारतीय ग्रामिण संस्कृतीचा अस्सल गोडवा अनुभवता येतो.
- बाहेरून आलेल्या व्यक्तीचे, पाहुण्यांचे आदरातिथ्य, आत्मियतेने, सेवा, चहा-पान, भोजन व महत्वाचे म्हणजे हल्ली अभावानेच जाणवणारा निस्वार्थ स्नेह आजही अनसिंग, खडसिंग, एंकाबा, जवळा, इलखी, उमराळा, उमरा कापसे, उमरा (शम), वारा, सापळी, शेलू आदि गावामध्ये विशेषत्वाने जाणवतो.
- रक्ताच्या नात्या ऐचढीचे स्नेहाची, प्रेमाची बांधीलकी प्रस्तुत संशोधक या परिसरामध्ये अनुभवीत आहे.
- महत्वाचे म्हणजे परिसरातील लोकांना आपण केलेल्या चुकांचा पश्चाताप होतो म्हणजेच सुधारण्याची मानसिकता येथे आहे.

- ❖ विशेष म्हणजे या परिसरातील तरूण पिढीचा कल हा देश रक्षणार्थ ,देश सेवार्थ संरक्षण क्षेत्रात सेवा देण्यासाठी अधिक दिसून येतो.प्रशासकिय सेवेमध्ये सुदधा प्रामाणिकपण सेवा करून समाज व देश सेवा करण्यात हा परीसर अग्रेसर आहे. या करीता अधिक प्रयत्नाचीही आवश्यकता आहे.
- ❖ पंरतू येथे प्रेमाने सर्व काही देण्यास तयार असणारा व्यक्ती येथे अन्याथ आणि स्वार्थी प्रवृत्ती दिसताच तेवढाच कठोर होतांना दिसतो. दुदैवाने येथे सार्वजनिक हितासाठी सामुदायीक प्रयत्नाचा अभाव निश्चीतच जाणवतो.[८] त्याचा परिणामही विकासावर होत आहे.

थोडक्यात निसर्गाचा वरदहस्त नसून शासनकर्त्याचेही दुर्लक्ष असलेल्या या ग्रामिण परिसरात आर्थिक, भौतिक प्रगती निश्चीतच दिसत नसली तरी मानसिक, आरोग्य विषयक व नैतिक दृष्टीने हा परिसर वैभव संपन्न आहे. या गावाला सर्वच दृष्टीने प्रगतशिल बनविण्याकरीता प्रामाणिक परीश्रम, उद्योगशिलता, आधुनिकता जोपासून राजकीय योग्य नेत्वृत्वाच्या इच्छाशक्तीमधून दूरगामी प्रयत्नाची मोठी आवश्यकता आहे. असे असले तरी अनसिंग गाव निश्चीतच वाशिम जिल्हातील ऐतिहासिक वारसा लाभलेले महत्वाचे गाव आहे हे निश्चीतच.

## संदर्भ व टिपा :


१) www.wikipedia.org/wilki/दशरथ
२) मूळावकर मोतीरात सर यांच्या दि.११/०१/२०१६ च्या मूलाखती मधून
३) प्रस्तुत संशोधकाचे प्रत्यक्ष निरिक्षण व विविध स्थळ भेटी
४) गावातील विविध जेष्ठांच्या संवादानूसार
५) मूळावकर मोतीराम सर यांच्या मूलाखती मधून
६) कित्ता
७) कित्ता
८) संशोधकांचे निरिक्षण, अनुभव व अभ्यासकांच्या निष्कर्षानुसार